## सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुंकळ्ळी – गोवा

### मराठी विभाग



# युवांकुर

**मराठी विभागाचे साहित्यिक नियतकालिक**
**आपल्या हक्काचे व्यासपीठ**

**अंक ५, वर्ष २०२४**

**अनुमोदक :**

उपप्राचार्य प्रो.
अविनाश रायकर

**संपादन मंडळ :**

सहायक प्रा.
शुभलक्ष्मी नाईक
गावकर

सहायक प्रा.
निहारिका वेळीप

अनामिका सावंत

धन्यता देसाई

सरोजा गावकर

रेखा मायनाथ

सलोनी फळदेसाई

प्रियांका च्यारी

अश्मिता परवार

# अनुक्रमणिका


❖ **संपादकीय**

❖ **कविता**

१. गौरव माझ्या मराठीचा / धन्यता देसाई
२. जाणता राजा / धन्यता देसाई
३. भीमराव / धन्यता देसाई
४. माझा गोवा / धन्यता देसाई
५. पाऊस / रेखा मायनाथ
६. आई / किर्ती वेळीप
७. एक आस / अनिशा प्र. गावकर
८. स्वर्ग गावलो / अनामिका सावंत
९. मी एकटी / अनामिका सावंत
१०. जन्म एका स्त्रीचा / अनामिका सावंत
११. वळण / अनामिका सावंत
१२. पाऊस / सलोनी उपेंद्र फळदेसाई
१३. श्रावण सरी / अश्मिता पवार

❖ **ग्रंथ परीक्षण :** मी संदर्भ पोखरतोय – समकालीन वास्तवाला भिडणाऱ्या कविता / अनामिका सावंत

❖ **निबंध :** श्रावण / सरोजा गावकर


।। शब्दची आमुच्या जीवाचे जीवन
शब्दे वाटू धन जनलोका ।।
-संत तुकाराम

# संपादकांच्या खिडकीतून डोकावताना..

प्रिय वाचकहो..

मराठी विभागाच्या ‘युवांकुर’ e-मासिकाचा हा पाचवा अंक आपल्यासमोर ठेवताना आम्हाला अत्यानंद होत आहे. गेल्या अंकाला आपण दिलेल्या प्रतिसादाने आम्ही धन्य पावलो. ह्या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या प्रतिभेच्या सर्व छटा अनुभवत आहेत याचे समाधान वाटते. मराठीचा हाच ध्यास ऊरी बाळगून सातत्याने साहित्यनिर्मिती करून आपल्या लिहित्या हातांना बळ देऊया..

मनस्वी आभार,

संपादन मंडळ

# कविता

## गौरव माझ्या मराठीचा

-धन्यता देसाई (तृतीय वर्ष,
कला शाखा)

गौरव माझ्या मराठीचा
गौरव तिच्या उज्वल परंपरेचा
ज्ञानोबा, नामदेव, चोखोबा, तुकाराम
यांचा वारसा जपणारी आपली भाषा....

विठ्ठलाची करुनी भक्ती
संतांनी दिली जीवनमूल्यांची शिदोरी
शंभू-शिवरायांची गर्जवीत गाथा
उभी राहिली माझी मराठी भाषा....




अक्षी, श्रवणबेळगोळ उगमस्थान जिचे
नवव्या शतकापासून आहे
लिखित स्थान हीचे
संत, पंत, तंत प्रवाहातून
वाहत आली ही गंगोधारा
अशी आहे आपली किर्तीवंत मराठी भाषा....

केशवसुतांनी गुंफली नवीनतेची तुतारी
दुमदुमली अखंड मराठी नगरी

आजही गोमंतकात परंपरा राखली जिची

ती आहे माझी समृद्ध मराठी....

ज्ञानपीठ, सरस्वती, साहित्य अकादमी

भजन, कीर्तन ऐकताना हरपले भान

उकार, वेलांटी, रेषांनी

साकारलीया मराठी भाषेची शान

करूया जतन या दिव्या भाषेचे

जपूया संस्कृतीचे, भाषेचे हे नाते....




शिकूया मराठी,

बोलूया मराठी,

जाणूया मराठी,

मानूया मराठी

कारण,

लाभले आम्हास भाग्य

मानतो मराठी

जाहलो खरेच धन्य

ऐकतो मराठी..

# जाणता राजा

-धन्यता देसाई (तृतीय वर्ष, कला शाखा)

मध्ययुगाच्या काळात
सूर्य उगवला शिवनेरी गडावर
तळपला तेजस्वी
चमत्कारच घडला
ह्या भूतलावर

प्रभात मराठा साम्राज्याची
मराठी संस्कृतीचे ते आदर्श
स्वामिभान जागवूनी
लढले, झुंजले
मिळवले स्वराज्य

पेटवूनी क्रांतीची मशाल
दाखवूनी सत्याचा मार्ग
रयतेचा तो पोशिंदा
गर्जला शूर वीर वाघ



होय, ते होते म्हणून आम्ही आहोत
आपले
छत्रपती शिवाजी महाराज...

गरिबांचा पाठीराखा
स्वराज्याचा ध्यास ज्यांनी बाळगला
तेच होते आपले
छत्रपती शिवाजी महाराज

प्राणपणाने लढून ज्यांनी
एकेक राज्य हो जिंकले
शत्रूंना त्रस्त करून
सळो की पळो करून सोडीले
धर्मरक्षणार्थ
स्वराज्य रक्षणार्थ
स्वाभिमान रक्षणार्थ
अवघे जीवन ज्यांनी वेचले
तेच होते आपले
वीर शिवाजी राजे

# भीमराव

**-धन्यता देसाई (तृतीय वर्ष, कला शाखा)**

चला सगळे एकत्र येऊन

करुया त्यांना नमन

इतिहास ज्यांनी घडविला

ज्यांनी केले सगळ्यांचे संघटन

होता अंधार त्यांच्या जीवनी

दुसऱ्याचे आयुष्य प्रकाशमान करण्याचा

ध्येय दिला त्यांना देवांनी

दलितांचा कणा बनले

स्वत्वाची मशाल पेटविली

शिक्षण घेताना रात्रंदिन एक केले

भारताचे संविधान लिहून

सर्वांना एका छताखाली आणले.



उठा शिका, संघटीत व्हा

आपल्या हक्का साठी लढा

नाही इथे कुणी कुणाचा गुलाम

हेच भिमराव सांगून गेले......

## **माझा  गोवा**

**-धन्यता देसाई (तृतीय वर्ष, कला शाखा)**

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला
निसर्गाच्या हिरव्यागार डोंगरांनी नटलेला
सर्वांना आकर्षित करणाऱ्या
समुद्रांनी बहरलेला
माझा महान गोवा

साहित्याची व कलेची खाण असलेला
सृजनशीलता जोपासणारा
सांस्कृतिक एकात्मता आणि सामाजिक ऐक्य
या मूल्यांची सांगड घालणारा
माझा श्रेष्ठ गोवा



अनेक धर्मांची लोकं एकोप्याने  इथे राहतात
सगळ्या भाषांना जोडून ठेवतात
शेती व मासेमारी हे प्रमुख उद्योग ज्याचे
सुशेगाद हे बिरूद ह्याच भूमीला तर मिळाले
मायेची छाया प्रेमाचा गारवा
दूरवर पसरवतो माझा गोवा
खूप काही आहे माझ्या गोव्याच्या भूमीवर
असा खास आहे माझा गोवा

# पाऊस

-रेखा मायनाथ (द्वितीय वर्ष, कला शाखा)

दुष्काळ पडलेल्या ह्या मनात पावसाचे थेंब पडावे

उधाणलेल्या वाऱ्याबरोबर

मन बेभान व्हावे

थोडेसे ढग बरसावे


त्यात शेतकरी प्रसन्न व्हावा,

सुख – दुःख विसरून सारे

जगण्याचा अर्थ शोधावा..







# आई

-किर्ती वेळीप (द्वितीय वर्ष, कला शाखा)

आई असते सोन्यासारखी

रागावली तरी प्रेम करणारी

कितीही त्रास पडू दे

नाही सांगणार ती कुणाला

काय चाललंय तिच्या मनी

आई असते विश्वास

पणतीची ती वात

आधारातील ती आधार

करते मायेची बरसात.

मन दुःखात असतं

पण चेहरा सुखात ठेवते

आई एक मैत्रिणीसारखी असते

लेकावंर जीवापाड प्रेम करते

आई असते एक धागा

पिल्लाला जगाची रीत शिकवणारा

ती असते एक ऊबदार घरटं

वाईट समयी पिल्लाला छत देणारं...

ठेच लागली की आठवते ती

भूक लागली की स्मरते ती

ऊन पावसाची फिकीर नसते त्या माउलीला

जेव्हा पिल्लासाठी तयार करायची असते

भविष्याची सुखद वाट...

# महिला दिवस

-किर्ती वेळीप (द्वितीय वर्ष,

कला शाखा)

संपूर्ण जगासाठी आहे ती जागी

करते सगळ्यांनाच मायेची लाडी

घरात शिजवते ती अन्नाची कणी

मुलांना देते ती शिक्षणाची गोडी

आयुष्यात घडते वाईट गोष्टी

तिच्या मुळे होते हिरवी सृष्टी

वाईट संकटात देते ती

स्त्रियांची साथ



गृहिणीच्या रूपात येते

करते ती रक्षण

हजारो स्त्रीयांचे

मनात तिच्या आठवते

माणसासाठी विचार

सांगून ठेवते ती

करा जीवन साकार

प्रत्येक क्षणी

येते तिची आठवणी

तिच्या नजरेतून आलेली

जीवनाची सुखद वाट...

# एक आस

-अनिशा प्र. गावकर (द्वितीय वर्ष,
कला शाखा)

कधी येईल ती पहाट

जेव्हा उघडेन दार

तेव्हा येईल फक्त मातीचा सुगंध

होईल थंडगार वाऱ्याचा स्पर्श

कधीही अवकाळी येणारा तो पाऊस

आता बोलावला तरी नाही येत

अरे, तुझ्या लेकरांना गरज आहे तुझी

आता तरी त्यांना भेट

आभाळाकडे बघून तो

बळीराजा बिचारा  म्हणतो

काही काही नको

हवे फक्त थोडे ओंजळभर पाणी

रुजलेल्या मनाची आणि

सुखलेल्या डोळ्यांची

आस एकच..

कधी तरी येईल तो पाऊस

घेऊनी जीवन सरी...



मालवणी कविता

## **स्वर्ग गावलो**

**-अनामिका सावंत (द्वितीय वर्ष,**

**कला शाखा)**

पावसान धरलो जोर

म्हणान कोपरो घेतलो नांगरुक

चला काढया मेरे

आणि तरवो घेवया पेरूक

मॅनकापडाची खोळ करून

सगळी तरवो काढूक जमली

थंडगार वाऱ्याच्या मजेत

गरम चाय पिवक बसली

पावसाच्या जोरार

चढणीक इले माशे

कुरल्याचो रस्सो खावक

पावसाचे दिवस व्हये तशे

तांदळाची भाकरी

आणि तेऱ्याचो बेत

मगे आणि काय व्हया ?

स्वर्गच गावलो थेट..





# मी एकटी

-अनामिका सावंत (द्वितीय वर्ष,
कला शाखा)

खरंच मी एकटी

आहे का?

एवढ्या माणसात

वावरते,

तरीही सतत भीती

जाणवते

ऐकते मी सगळ्यांचे

समजावते मी सगळ्यांना

पण बोलते मी

मनाचे मनाशीच

हिम्मत केली काहीतरी

कमावण्याची,

मात्र सतत भीती भासते

ती गोष्ट

गमावण्याची

अनेक गोष्टी पिंगा घालतात

माझ्या मनाभोवती

का भीती वाटते मला माझ्याच विचारांचीच?

कदाचित कारण असावे हेच

म्हणून मी एकटी, म्हणून मी एकटी..



# जन्म एका स्त्रीचा

-अनामिका सावंत (द्वितीय वर्ष,

कला शाखा)

ती एक आई असते

ती एक बहीण असते

ती एक मैत्रीण असते

ती एक पत्नी असते

सर्व जबाबदाऱ्या ती

एकटी पार पाडते

आपल्या इच्छा लपवून ठेवते

दुसऱ्यांचा विचार नेहमी करते

कितीहा राग आला तर शांत राहते

तिने नेहमी असंच राहावं का?

तिला कमी समजण्याची चूक करू नका

तिच्यातील शक्ती अजूनही

तुम्हाला जाणवली नाही

सरस्वतीच्या सोबतीने

दुर्गेचे रूप घेऊन

तिला अडवणाऱ्यांना ती सोडणार नाही

आपला स्त्री जन्म

व्यर्थ जावू देणार नाही

व्यर्थ जावू देणार नाही

# वळण

-अनामिका सावंत (द्वितीय वर्ष,

कला शाखा)

चालत आले पायी

रस्ता नाकासमोर

सुरळीत होता रस्ता

प्रकृतीने माखलेला

सुंदर वाटत होता

पुढचा हा प्रवास

जोमात चालत होते मी

घेऊन जिंकण्याची आस..

पण,

माहीत नव्हतं मला

वाढत्या वयासोबत

सुरळीत रस्त्याला

वळणं येतात

वेगवेगळ्या आव्हानांनी

त्या प्रकृतीत मिसळतात

एक वळण पार केले

की अनेक वळणं येतात

मात्र अनुभवाचे गाठोडे देऊन

जीवनात चालत राहण्याची

हिम्मत देऊन जातात.

# पाऊस

**-सलोनी उपेंद्र फळदेसाई (प्रथम वर्ष,**

**कला शाखा)**

आभाळात ढगांची दाटी झाली

जुनाच तो पाऊस बरसतोय पुन्हा

एकदा नवा होऊन



सभोवताली सगळे अंधारून येते

पहिल्या पावसाच्या मातीच्या

सुगंधाची चाहूल सर्वांना लागते

ढगसुद्धा पावसाचे पाढे वाचू लागले

धो-धो करून जमिनीवर धारांचे

सडे पडू लागले

विजबाई चमकून एकदम पाहू लागली खाली

कसा तो पाऊस झाडझुडपांना

आंघोळ घाली

झाडे-झुडपे, वेली, फुले हळूच हसली

पाऊस झेलायला मुले

धावत धावत आली.



# श्रावण सरी

-अश्मिता पवार (प्रथम वर्ष,

कला शाखा)

आला रे आला श्रावणमास आला

नदी, ओहळ, तळे, झरे

खळखळून निघाले

आला रे आला

श्रावणमास आला

हिरवाईचा शालू नेसून

राने, मळ, डोंगर-दऱ्या

नव्या नवरीसारखे नटले

दवबिंदूच्या स्पर्शाने

अंगअंग मोहरून गेले

रिमझिम रिमझिम पावसात

सुगंधित ती माती

पाटी, दपतर, रेनकोट आणि

जुनी शाळा आठवली

आला रे आला

श्रावणमास आला

मंदिराच्या घंटेने जाग आली

सणावारांना सुरुवात झाली

भजन-कीर्तनाच्या गजराने

अवघा परिसर दुमदुमला

आला रे आला श्रावणमास आला..



# परीक्षण

## 'मी संदर्भ पोखरतोय' : समकालीन वास्तवाला भिडणाऱ्या कविता

-अनामिका सावंत (द्वितीय
वर्ष, कला शाखा)




'मी संदर्भ पोखरतोय' हा कवितासंग्रह कवी पवन नालट यांचा आहे. कवी पवन नालट नव्वदोत्तर पिढीच्या उत्तरार्धातील महत्त्वाचे कवी आहेत. 'मी संदर्भ पोखरतो' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहातून ते नव्या पिढीला समाजाचे समकालीन चित्र दाखवून देतात.

'मी संदर्भ पोखरतो' या कवितासंग्रहात एकूण साठ कवितांचा समावेश आहे. कवींनी ह्या संग्रहातून वेगवेगळ्या विषयांवर आपले विचार मांडून समाजाचे खरे चित्रण केलेले दिसून येते. या कवितासंग्रहात काही कविता अशा येतात त्यात कवीने आपल्या अस्तित्वाचा उलगडा केला आहे. कवी पवन नालट यांनी देशात होणारे राजकारण, भ्रष्टाचार, धर्मा-धर्मात होणारे भेदभाव, आयुष्याची झुंज, दुःख, आठवणी अशा अनेक विषयांवर कविता लिहिल्या आहेत.

कवीने कवी आणि कविता यातील एकरूपता दाखवलेली आहे. तसेच कवी आपल्या अस्तित्त्वाची जाणीव व्यवस्थेला करून देतो. या कवितांमध्ये सामान्य माणसाची व्यक्त झालेली घुसमट आपल्याला दिसून येते.

कवी 'वीण' कवितेतून सांगू पाहतो की त्यांनी अजून तरी स्वतःला विकलेले नाही. कवीच्या प्रामाणिक जाणिवांच्या परिघातच या कवितेचे वात्सल्य आणि वास्तव्य जोडलेले आहे.

'तो सांगत नाही वारंवार
व्यवस्थेला भोक पडल्याची कहाणी
तो लावत नाही
फिरंग्यांच्या कपाळावर
रक्तचंदन
करत नाही
मेणाच्या पुतळ्यांचे संग्रहालय तयार
कवी देत असतो वठलेल्या झाडांचा संदर्भ
अस्तित्वाच्या कोवळ्या देठासाठी.'

आजच्या कवितेत वावरणारी पिढी जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या स्वप्नांच्या बाजारपेठांमधून केव्हाच निघाली आहे. तिचा सामाजिक, राजकीय, व सांस्कृतीक भ्रमनिरास झाला आहे.  आपल्या बालपणीच्या आठवणी व जगणं, माणसामाणसातील आपूलकी व आजच्या पिढीवर होणारे प्रभाव व त्यांची झालेली घालमेल कवी आपल्या कवितेतून सांगू पाहतात. जसे की -  'आजीबाई', 'बधीरता', 'शाळा : काही नोंदी' इ.

'भिजलेली वाट' या कवितेतून कवी निसर्गाची उपमा देऊन बाईचं जगणं व्यक्त करू पाहतात. त्या छोट्याशा कवितेतून एक खोल अर्थ सांगू पाहतात. सामान्य माणसांच्या दु:खाचा एको या कवितेच्या असण्यातून ऐकू येतो. 'खिडकी आणि कवडसा' या कवितेत आलेली खिडकी म्हणजे सामान्यांचे अंधारे विश्व होय. गुलामांना प्रकाशाची ओळख करून देण्यात येत नाही. त्यांच्या स्वप्नांचा अनादर केला जातो. अंधारात वाट पाहत असलेल्या खिडक्या किलकिल्या होऊ शकतात. त्या प्रकाशाच्या मार्गाने आपला विसरून टाकलेला भूतकाळ पुन्हा वर्तमानाशी जोडून आपल्या वैभवाचा प्रकाश अनुभवू शकतो. या कवितासंग्रहातील बहूतांश कविता समाजातील ज्वलंत प्रश्नांवर विचार करायला लावणाऱ्या आहेत असे मला वाटते.

या कविता संग्रहात आलेल्या दीर्घ कविता आजच्या काळाचा एकंदर लेखाजोखा मांडताना दिसतात. 'शाळा: काही नोंदी' ही कविता मनाशी असलेले, बाळगलेले स्वप्न आणि वास्तवाच्या दोन्ही बाजू मांडताना दिसते. मुलांचे भावविश्व जपणारा कवी बदललेल्या अवस्थेत वेशीवर टांगणाऱ्या गुरू शिष्यामधील वाढते अंतर पाहणारा शिक्षक या कवितेत उन्मळून पडलेला वडाचा भला मोठा वृक्ष एकेकाळच्या शिक्षण व्यवस्थेचा निर्देशक म्हणून येतो. एक प्रतिक म्हणून येतो.

'बाईचं जगणं: दहा कविता' ह्या दीर्घ कवितेत स्त्रीच्या असण्याचा विलक्षण असा ऐवज घेऊन आला आहे. तिचे आजच्या समाज वास्तवात असलेले स्थान, तिचा पौराणिक अवस्थेतील अनुबंध आणि आजच्या पुरूषसत्ताक व्यवस्थेत होणारी घुसमट पाहताना आपल्या मनाला खंत वाटल्याशिवाय राहत नाही. असे हे बाईचे जगणे कधी समाजात दृश्य होणाऱ्या अवहेलना तर कधी अदृश्यपणे होणारी होरपळ सोसताना दिसून येत असल्याची भावना कवी व्यक्त करतात.

कवितेचा एक वेगळ्या अनुभवाचा दीर्घावकाश म्हणून या कवितासंग्रहातील 'हम-नफस : काही नोंदी' ही कविता परधर्मातील चालिरीतीबद्दल आब राखत धर्मामुळे शून्य झालेले माणूसपण या विषयी बरेच काही सांगून जाते. आता केवळ माणसांतील धर्माने निर्माण केलेली हिंसाच बाकी आहे.

समकालीन वास्तवात सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतीक अंगाला भिडणाऱ्या निरनिराळ्या अवस्थांच्या कविता या संग्रहात आलेल्या आहेत. त्याचबरोबर काही वयैक्तिक संवेदना आपल्या मनाच्या कोपऱ्यात जागा देणाऱ्या या कवितेतून जाग्या होताना दिसतात.



# निबंध

# श्रावण

**-सरोजा गावकर (तृतीय वर्ष,**
**कला शाखा)**

"श्रावणमासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात फिरुनी ऊन पडे"

श्रावण महिना म्हटल्यावर बालकवींच्या कवितेचे स्मरण ते होणारच. मराठी महिन्यात सलग येणारा हा पाचवा महिना. जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात श्रावण सुरू होतो. वातावरणात एक वेगळीच लाली आलेली असते. सभोवताली पहिलं तर हिरवीगार नटलेली सृष्टी अतिसुंदर आणि विलोभनीय दिसू लागते. प्राणी, पक्षी सगळेच आनंदित झालेले असतात. जाई-जुई, चाफा सारख्या कितीतरी फुलांना बहर आलेला असतो. कोकिळा मधुर गुंजन करते तर मोर आपला पिसारा फुलवून मनसोक्त नाचतो. सकाळी सर्वत्र दाट धुकं पसरलेलं असतं. झाडांवर पडलेले पावसांचे थेंब मोत्यांसारखे दिसत असतात. इन्द्रधनुष्य ह्या परिसरात एक वेगळीच मजा आणत असतो.

शेतकऱ्यांसाठी श्रावण महिना हा अतिशय महत्त्वाचा असतो. कारण त्यावेळी शेतकरी अनेक प्रकारची धान्ये, भाजीपाला इत्यादी पेरतात. भात, मका, बाजरी, सूर्यफूले आणि अनेक प्रकारच्या भाज्यांची पेरणी या महिन्यात केली जाते.

हिंदू धर्मात श्रावण महिना हा पवित्र महिना मानला जातो. विविध सण जसे की रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, नागपंचमी, गोकुळाष्टमी इत्यादी ह्याच महिन्यात होतात. हिंदूंच्या धार्मिक भावना आणि श्रद्धा ह्या महिन्याशी जोडलेल्या आहेत. रक्षाबंधन हा भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण आहे. तर नारळी पौर्णिमेच्या दिवशी सागराला भक्तीभावाने नारळ अर्पण केला जातो. नागपंचमीला नागराजाची पूजा केली जाते. तर गोकुळाष्टमी म्हणजे कृष्णाचा जन्मदिन. ह्या दिवशी तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच आनंदात असतात. एवढेच काय १५ ऑगस्ट म्हणजेच आपल्या भारताचा स्वातंत्र्यदिनही ह्याच महिन्यात येतो.

श्रावणातील सोमवार भाविक भक्तीभावाने पूजतात. तर मंगळवारी गणपतीची पूजा केली जाते व शनिवारी मारुतीची. असे म्हणतात की, श्रावण महिन्यात भगवान शंकर आणि माता पार्वती ह्या महिन्यात पृथ्वीवर निवास करतात. हा जसा भक्तीचा महिना आहे तसाच सृजनाचाही महिना आहे. सर्वत्र नव जीवन अंकुरताना दिसते. सगळीकडे केवळ आनंदमय वातावरण घेऊन येतो. असा हा श्रावणमास, असा हा श्रावणमास!

चैत्र, वैशाख, आश्विन, कार्तिक
मला न भावे यातलं काही
प्रिय मजला एकच आहे
रिमझिम रिमझिम श्रावणातल्या सरी..

|| युवांकुर ||

मराठी

विभाग